# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 20 April 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २० एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

गुणवत्तापूर्ण, परवडणारी आणि सहज उपलब्ध होणारी आरोग्य सेवा समाजातल्या प्रत्येकापर्यंत पोहोचली पाहिजे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते मुंबई इथं २२व्या एंडोस्कोपी पुरस्कार वितरण समारंभात बोलत होते. गेल्या दोन वर्षात राज्यात दहा नवी वैद्यकिय महाविद्यालयं स्थापन झाल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले.

****

सतराव्या नागरी सेवा दिनानिमित्त, पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सोमवारी सकाळी अकरा वाजता नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं नागरी सेवेतील कर्मचाऱ्यांना संबोधित करतील. सार्वजनिक प्रशासन सेवा उत्कृष्टता पंतप्रधान पुरस्कारांचही यावेळी वितरण होणार आहे.

****

राज्यात सर्वत्र कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ होत आहे. विदर्भात पुढील तीन दिवस उष्णतेच्या लाटेची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली असून मध्य महाराष्ट्रात आज आणि गुजरातमध्ये बुधवारपर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहील, असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. दरम्यान, जम्मू-कश्मीरमध्ये आज रामबन जिल्ह्यात गारपीट आणि काही भागात भूस्खलन झाल्याचं वृत्त आहे.या भागात सतत होणाऱ्या पावसामुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय राजमार्गावर अनेक ठिकणी जमिन खचल्यानं वाहतुक प्रभावित झाली आहे. श्रीनगर-सोनमर्ग-गुमरी मार्ग, ऐतिहासिक मुगल मार्ग औआणि सिंथन टॉप मार्ग बंद आहेत.

****

ईस्टर संडे सण आज सर्वत्र भक्तीभावात साजरा करण्यात येत आहे. प्रेषित येशूंच्या पुनरुत्थाच्या या दिवसाच्या स्मरणार्थ सर्वत्र चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभा, धार्मिक

कार्यक्रम सुरु आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईस्टर संडेनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. इस्टरचा सण ही नवीन आशा आणि नवीन सुरुवातीची भावना यांचे प्रतीक आहे. येशू ख्रिस्तांचा संदेश मानवजातीला प्रेम आणि त्यागाच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देतो, असं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. संभाजीनगर इथं छावणी, शांतीपुरा इथं विविध उपक्रमांनी ईस्टर संडे साजरा करण्यात येत आहे.

****

पवित्र अमरनाथ यात्रेच्या नोंदणीला आता प्रारंभ झाला आहे. जम्मू-काश्मीरमधील या ५२ दिवसीय वार्षीक तीर्थयात्रेसाठी ऑनलाईन संकेतस्थळ किंवा देशभरातील निवडक बँक शाखांमधून याची नोंदणी शक्य आहे. तसंच, तंदुरुस्तीबाबतचं वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणं अनिवार्य असणार आहे. यात्रेत, प्रतिदिवशी १५ हजार याप्रमाणे यात्रेकरुंची संख्या निश्चित करण्यात आली आहे. येत्या तीन जुलै ते नऊ ऑगस्ट असं यात्रेचं वेळापत्रक आहे.

****

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेत आज दुपारी साडेतीन वाजता चंदीगड इथं पंजाब किंग्ज आणि रॉयल चँलेजर्स बंगरुळू तर, रात्री साडेसातला मुंबईमध्ये मुंबई इंडीयन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज हे सामने होत आहेत. स्पर्धेत सध्याच्या अद्ययावत आकडेवारीनुसार क्रमवारीत चार संघ दहा गुणांसह आघाडीवर आहेत मात्र धावांच्या सरासरीचा विचार करता गुजरात टायटन्स पहिल्या, दिल्ली कॅपिटल्स दुसऱ्या,पंजाब किंग्ज तिसऱ्या तर,लखनऊ सपर जायन्टस चौथ्या स्थानावर आहेत.

****

जागतिक स्वॉश विजेतेपद पात्रता क्रीडा स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारताचे वीर चोटरानी आणि अनाहत सिंह च्यांच्यात अंतिम लढत होत आहे. मलेशियाच्याके क्वालालंपुर इथं थोड्याच वेळात दुपारी दोन वाजता हा सामना होईल. याद्वारे अमेरीकेतील शिकागो इथं होणाऱ्या आगामी जागतिक स्क्वॅश स्पर्धेत सहभाग निश्चिती होणार आहे.

****

राज्यात काही ठिकाणी सुरू असलेल्या बेकायदेशीर बालगृह, वसतिगृह आणि अनाथाश्रमांविरोधात एक वर्ष कारावास, एक लाख रुपये दंड अशा शिक्षांची कारवाई होणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी दिली आहे. अनधिकृत संस्थांमध्ये बालकांना डांबून ठेवणं, त्यांचं शारीरिक,

मानसिक-लैंगिक शोषण होत असल्याच्या घडत आहेत. कायद्यानुसार कोणत्याही संस्थेला नोंदणी प्रमाणपत्राशिवाय बालकांची देखभाल करण्याची परवानगी नाही. नागरिकांनी सतर्क राहून अनधिकृत बालक संस्था आढळल्यास जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी मोफत दुरध्वनी क्रमांक एक-शुन्य-नऊ-आठ या क्रमांकावर संपर्काचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

रोजगार हमीच्या कामांची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक उद्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहे. पैठण तालुक्यातल्या ११० गावांपैकी ३० गावांची हे पथक तपासणी करणार आहे. अभिलेखे, सोई सुविधा उपलब्ध आहेत की नाही याची चौकशी या दौऱ्या अंतर्गत केली जाणार असल्याची माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

****

रायगड जिल्ह्यातल्या श्रीवर्धन तालुक्यात वेळास समुद्र किनाऱ्यावर तीन युवकांचा बुडून मृत्यू झाला. काल ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेत मृत्यू झालेले दोघं भाऊ तर तिसरा युवक त्यांच्याकडे आलेला पाहुणा आहे. किनाऱ्यावर क्रिकेट खेळत असताना समुद्रात गेलेला चेंडू आणण्यासाठी गेले असता पाण्याचा अंदाज न अल्यानं त्यांचा मृत्यू झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

वाशिम जिल्ह्यात गेल्या आठ एप्रिलपासून पोषण पंधरवडा सुरू झाला असून यात जिल्हा परिषद एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयातर्फे विविध उपक्रम घेण्यात येत आहेत. जागरूकता निर्माण करणे, सकस आहार, कुपोषण आणि संबंधित समस्या कमी करणे ही याची उद्दीष्टं असल्याचं प्रशासनातर्फे कळवण्यात आलं आहे.

****